## मा.मंत्री (महसूल व कृषी) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई

दिनांक :- १ जानेवारी, 2016

*हवामान आधारीत फळपिक विमा योजना*

# जळगांव जिल्ह्यातील 32,543 शेतकरी सहभागी शेतकऱ्यांना 79 कोटी 46 लाख 31 हजार 761 नुकसान भरपाई अदा

मुंबई, दि. 1जानेवारी : सन 2011-12 पासून महाराष्ट्रात हवामान आधारीत फळपिक विमा योजना राबविण्यात येत असून सन 2013-14 आणि सन 2014-15 या दोन वर्षांमध्ये जळगांव जिल्ह्यातील 32,543 शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग घेतला होता. पैकी 15,290 शेतकऱ्यांना 79 कोटी, 46 लाख, 31 हजार, 761 एवढ्या रक्कमेची नुकसान भरपाई या योजनेंतर्गत देण्यात आली, अशी माहिती राज्याचे कृषीमंत्री एकनाथराव खडसे यांनी आज येथे दिली.

जळगांव जिल्ह्यातील या फळपिक विमा योजने विषयी माहिती देतांना खडसे पुढे म्हणाले की, फळपिक विमा योजनेमध्ये जळगांव जिल्ह्यातील एकूण 14 तालुक्यांमध्ये ही योजना राबविली जाते. **सन 2013-14** यावर्षी जळगांव जिल्ह्यातील एकूण 10,037 शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग घेतला या शेतकऱ्यांनी विमा हप्त्यापोटी 18,00,27,960 एवढी रक्कम भरली. तर या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई पोटी 64,36,46,830 एवढी रक्कम मिळाली.

फळपिक विमा योजनेमध्ये जळगांव जिल्ह्यातील एकूण 14 तालुक्यांमध्ये ही योजना राबविली जाते. **सन 2014-15** यावर्षी जळगांव जिल्ह्यातील एकूण 22,506 शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग घेतला. या शेतकऱ्यांनी विमा हप्त्यापोटी 41,45,38,722 एवढी रक्कम भरली. तर 8,054 शेतकऱ्यांना नुकसान भरपाई पोटी 15,09,84,931 एवढी रक्कम मिळाली. याबाबतची कार्यवाही अजुनही सुरु आहे.

खडसे पुढे म्हणाले की, हवामान आधारीत फळपिक विमा योजना राज्यातील 30 जिल्ह्यांमध्ये मंडळ हा घटक धरून योजना राबविली जाते. संबंधित महसूल मंडळात किमान 20 हेक्टर किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या फळपिकासाठी ही योजना लागू आहे. ज्या महसूली मंडळांमध्ये ही योजना राबविली जाते अशा सर्व मंडळांमध्ये स्वयंचलित हवामान केंद्रे बसविण्यात आली आहेत. योजनेत सहभागी

होणाऱ्या शेतकऱ्यांना 50 टक्के रक्कम स्वत: भरावी लागते, 25 टक्के रक्कम केंद्र शासन व 25 टक्के रक्कम राज्यशासन अनुदान स्वरुपात शेतकऱ्याला विमा हप्ता भरण्यासाठी देते.

सन 2015-16 मध्ये दिनांक 03/12/2015 च्या शासन निर्णयाद्वारे जळगांव जिल्ह्यातील केळी, डाळींब व द्राक्ष या फळपिकांचा या योजनेमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. जिल्ह्यातील 14 तालुक्यातील 75 महसूल मंडळांमध्ये ही योजना राबविण्यात येत आहे.

योजनेमध्ये तालुका निहाय सहभागी महसूल मंडळांचा तपशिल

| अ.क्र. | तालुका | सहभागी महसूल मंडळे | मंडळांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | जळगांव | पिंप्राळा, भेकर, म्हसावद, नशिराबाद | 4 |
| 2 | भुसावळ | भुसावळ, वरणगांव, पिंपळगांव (ख) | 3 |
| 3 | मुक्ताईनगर | मुक्ताईनगर, अंतुर्ली, घोडसगांव, कुऱ्हा | 4 |
| 4 | रावेर | रावेर, खानापूर, ऐनपूर,खीर्डी (बु), निंभोरा (बु.), खिरोंदा, सावदा | 7 |
| 5 | यावल | यावल, किनगांव, साकळी, बामनोद, भालोदा, फैजपूर | 6 |
| 6 | बोदवड | नाडगांव | 1 |
| 7 | अंमळनेर | अंमळनेर, नगाव, पातोंडा, अंमळगाव, मारवाड | 5 |
| 8 | चोपडा | चोपडा, गोरगांवले, चहार्डी, हातेड, अडावद, धानोरा प्र., लासूर, गोडगावले. | 8 |
| 9 | धरणगांव | सानवद, धरणगांव, साळवा, पिंप्री, रोटवद, चांदसार, पलाडी | 7 |
| 10 | एरंडोल | एरंडोल, हिंगणगांव, उत्राण (गृह), कासोदा | 4 |
| 11 | भडगांव | भडगांव, कजगांव, कोळगांव, आमडदे | 4 |
| 12 | जामनेर | जामनेर, नेरी, मालदाभाडी, पहूर, शेंदूर्णी, तोंडापूर, फत्तेपूर, वाकडी | 8 |
| 13 | चाळीसगांव | चाळीगांव, शिरसगाव, बहाळ, | 7 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मेहुणाबारे, हातले, तळेगाव, खडकी (बु.) | |
| 14 | पाचोरा | पाचोरा, नांद्रा, कुऱ्हाड (बु.), नगरदेवळा, गाळण, वरखेडी (बु.), पिंपळगांव | 7 |
| | | **एकूण** | **75** |

केळी या फळपिकासाठी जळगांव जिल्ह्यांतर्गत खालील तालुक्यातील महसूल मंडळांचा आज दि. 01/01/2016 रोजीच्या शासन निर्णयाच्या शुध्दीपत्रकाद्वारे समावेश करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **तालुका** | **महसूल मंडळ** | **मंडळांची संख्या** |
|---|---|---|---|
| 1 | जळगांव | असोदा | 1 |
| 2 | भुसावळ | कुऱ्हे प्र.न. | 1 |
| 3 | बोदवड | बोदवड, करंजी | 2 |
| 4 | धरणगाव | सोनवद बु. | 1 |
| 5 | पारोळा | तामसवाडी, बहादरपूर | 2 |
| | | **एकूण** | **7** |

शुध्दीपत्रकातील 7 महसूल मंडळातील शेतकऱ्यांना पुढील 10 दिवसांत विम्याचा हप्ता भरुन योजनेत सहभागी होता येईल.

**-**